प्रकल्प अंमलबजावणी समितीने दि.०१/०६/२०२६ व दि.१८/०६/२०२६ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार प्रकल्पांना व त्यावरील खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दीमत्ता विभाग
शासन निर्णय क्रमांक : PIC-२०२६/प्र.क्र.८२/Tech-१ (E-१७३१५६१)
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०९ जुलै, २०२६

वाचा:

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मातंसं/नस्ती-०५/४३६/३९, दि. १० फेब्रुवारी, २००५.
२. सामान्य प्रशासन विभाग (मातं), शासन निर्णय क्र. HPC-२०२६/C.R.२७/IT, दि. २७ फेब्रुवारी, २०२६.
३. दि. ०१ जून, २०२६ रोजीच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.
४. दि. १८ जून, २०२६ रोजीच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना :

राज्याचे प्रशासन अधिक गतिमान तसेच लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने माहिती तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर व्हावा यासाठी प्रशासकीय कामकाजाचे संगणकीकरण करुपयेन त्याच्या अंमलबजावणीसाठी सामान्य प्रशासन विभागाच्या नियंत्रणाखाली माहिती तंत्रज्ञान संचालनालय स्थापन करण्यात आले आहे. तसेच दि. २३ सप्टेंबर, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये “ई प्रशासन धोरण” तयार करण्यात आले आहे.

सदर शासन निर्णयामधील तरतूदीनुसार तसेच संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये घालून दिलेल्या मर्यादेनुसार माहिती तंत्रज्ञान विषयक प्रकल्पांना आणि बाबींना रुपये दहा लाख ते रुपये पाच कोटी पर्यंत येणाऱ्या खर्चास प्रकल्प अंमलबजावणी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये माहिती तंत्रज्ञान संचालनालयाची प्रकल्प अंमलबजावणी समिती गठीत करण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार माहिती तंत्रज्ञान विषयक प्रकल्पांसाठी येणाऱ्या बाबींवरील खर्च माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या मंजूर अर्थसंकल्पिय निधीतून तसेच शासनाकडून ई-गव्हर्नन्स प्रकल्पाकरिता राज्य सेतू सोसायटीला प्राप्त होणाऱ्या निधीतून करण्यात येतो. प्रकल्प अंमलबजावणी समितीने दि. ०१ जून, २०२६ व दि. १८ जून, २०२६ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयांसंबंधी प्रशासकीय आदेश निर्गमित करणे आवश्यक होते.

शासन निर्णय:

संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयानुसार माहिती तंत्रज्ञान संचालनालयाअंतर्गत गठीत केलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीची बैठक दि. ०१ जून, २०२६ व दि. १८ जून, २०२६ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार खालील प्रकल्पांना व त्यावरील खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	समितीच्या बैठकीचा दिनांक	समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला विषय	समितीने घेतलेला निर्णय	निर्णयानुसार खर्चास देण्यात आलेली मान्यता
१.	०१/०६/२०२६	इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालयामार्फत मुख्यमंत्री सचिवालय, उपमुख्यमंत्री कार्यालय, मुख्य सचिव टपाल कक्ष, मध्यवर्ती टपाल कक्ष, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालय, इ. याकरिता आवश्यक एकूण १६८ आयटी ऑफिस असिस्टटच्या सेवांना मार्च, २०२६ अखेर दिलेल्या मुदतवाढीचा कालावधी संपुष्टात आल्याने सदर पदांना दिनांक ०१ एप्रिल, २०२६ ते ३० सप्टेंबर, २०२६ पर्यंत मुदतवाढ देणे व त्यापोटी येणाऱ्या एकूण रु.४,०७,५५,३२६.१६/- (करा सहित) इतका खर्चास मान्यता देणेबाबत.	प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालयामार्फत मुख्यमंत्री सचिवालय, उपमुख्यमंत्री कार्यालय, मुख्य सचिव टपाल कक्ष, इ. याकरिता एकूण १६८ आयटी ऑफिस असिंस्ट यांच्या सेवांना तत्कालीन संचालनालयाच्या दि.०३.०२.२०२६ च्या पत्रान्वये दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२५ ते ३१ मार्च, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. सदर पदांची आवश्यकता असल्याने उक्त १६८ पदांना दिनांक ०१ एप्रिल, २०२६ ते ३० सप्टेंबर, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यास व त्यापोटी येणाऱ्या एकूण रु.४,०७,५५,३२६.१६/- (करासहित) खर्चास आयुक्तालयाच्या २०५२ ०४८२ या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ करिता उपलब्ध असलेल्या	समितीने घेतलेल्या निर्णयानुसार सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने महाआयटी यांना अदा करावयाच्या अंदाजे एकूण रक्कम रु.४,०७,५५,३२६.१६/- (करासहित) इतक्या खर्चास मागणी क्र. A-०४, मुख्य लेखाशिर्ष (२०५२)-सचिवालयीन सर्वसाधारण सेवा, (००) (११) माहिती तंत्रज्ञान संचालनालय (२०५२ ०४८२), "१७-संगणक खर्च" या लेखाशिर्षा अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीमधून भागविण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	समितीच्या बैठकीचा दिनांक	समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला विषय	समितीने घेतलेला निर्णय	निर्णयानुसार खर्चास देण्यात आलेली मान्यता
			तरतूदीमधून महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळास अदा करण्यास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.	
२.	०१/०६/२०२६	मा. मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाअंतर्गत "जिल्हा समन्वयक" म्हणून कार्यरत असलेल्या ३६ IT Office Assistance च्या सेवांचा कालावधी दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ रोजी संपुष्टात आला असल्याने सदर पदांना दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२५ ते ३० सप्टेंबर, २०२६ या कालावधीसाठी मुदतवाढ देणे व त्याकरिता येणाऱ्या एकूण रू.१,६९,६१,७५४.२४/- (करासहित) इतकी रक्कम महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ यांना अदा करण्यास मान्यता देणेबाबत.	प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालयामार्फत मा. मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाअंतर्गत जिल्हा स्तरावर "जिल्हा समन्वयक" म्हणून कार्यरत असलेल्या ३६ IT Office Assistance पदांना तत्कालीन संचालनालयाच्या दि.२६.०३.२०२६ च्या पत्रान्वये दिनांक ०१ जुलै,२०२५ ते ३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. सदर पदांची आवश्यकता असल्याने उक्त ३६ पदांना दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२५ ते ३० सप्टेंबर, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यास व त्यापोटी येणाऱ्या एकूण रु.१,६९,६१,७५४.२४/- (करा सहित) खर्चास आयुक्तालयाच्या २०५२ ०४८२ या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ करिता उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळास अदा	समितीने घेतलेल्या निर्णयानुसार सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने महाआयटी यांना अदा करावयाच्या अंदाजे एकूण रक्कम रू.१,६९,६१,७५४.२४/- (करासहित) इतक्या खर्चास मागणी क्र. A-०४, मुख्य लेखाशिर्ष (२०५२)-सचिवालयीन सर्वसाधारण सेवा, (००) (११) माहिती तंत्रज्ञान संचालनालय (२०५२ ०४८२), "१७-संगणक खर्च" या लेखाशिर्षा अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीमधून भागविण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	समितीच्या बैठकीचा दिनांक	समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला विषय	समितीने घेतलेला निर्णय	निर्णयानुसार खर्चास देण्यात आलेली मान्यता
			करण्यास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.	
३.	०१/०६/२०२६	Proposal for Administrative Approval for Development of the Remaining DBT Schemes (excluding the 103 schemes) under MahaDBT 2.0 by MahaIT.	The Proposal for administrative approval for DBT is Approved. The Software must be developed in house with MahaIT Manpower. The total cost of the proposal is Rs.4,82,51,433/-(Inclusive of taxes)	समितीने घेतलेल्या निर्णयानुसार सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने महाआयटी यांना अदा करावयाच्या अंदाजे एकूण रक्कम रु. ४,८२,५१,४३३/-(करासहित) इतक्या खर्चास मागणी क्र. A-०४, मुख्य लेखाशिर्ष (२०५२)-सचिवालयीन सर्वसाधारण सेवा, (००) (११) माहिती तंत्रज्ञान संचालनालय (२०५२ ०४८२), "१७-संगणक खर्च" या लेखाशिर्षा अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीमधून भागविण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.
४.	०१/०६/२०२६	राज्यातील भारतीय प्रशासन सेवेतील अधिका-यांच्या माहितीसाठी सामान्य प्रशासन विभागाच्या कार्यासन-१० कडून http://Mahaias.maharashtra.gov.in या वेबसाईटसाठी मे.NICSI मार्फत १ Sr. Software Developer आणि १ Jr. Software Developer अश्या २ तांत्रिक मनुष्यबळांच्या सेवांना दिनांक ०१ एप्रिल, २०२६ ते ३० सप्टेंबर, २०२६ पर्यंत मुदतवाढ देणे व त्यापोटी	भारतीय प्रशासन सेवेतील अधिका-यांच्या माहितीसाठी सामान्य प्रशासन विभागाच्या कार्यासन-१० कडून http://Mahaias.maharashtra.gov.in या वेबसाईटसाठी मे.NICSI मार्फत १ Sr. Software Developer आणि १ Jr. Software Developer अश्या २ तांत्रिक मनुष्यबळांच्या सेवांना दिनांक ०१ एप्रिल, २०२६ ते ३० सप्टेंबर, २०२६ पर्यंत मुदतवाढीस व त्यापोटी येणाऱ्या एकूण	समितीने घेतलेल्या निर्णयानुसार सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने अदा करावयाच्या अंदाजे एकूण रक्कम रु.११,३०,२७३/-(करासहित) इतक्या खर्चास मागणी क्र. A-०४, मुख्य लेखाशिर्ष (२०५२)-सचिवालयीन सर्वसाधारण सेवा, (००) (११) माहिती तंत्रज्ञान संचालनालय (२०५२ ०४८२), "१७-संगणक खर्च" या लेखाशिर्षा अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीमधून

अ.क्र.	समितीच्या बैठकीचा दिनांक	समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला विषय	समितीने घेतलेला निर्णय	निर्णयानुसार खर्चास देण्यात आलेली मान्यता
		येणाऱ्या एकूण रु.११,३०,२७३/- (करासहित) इतक्या खर्चास मान्यता देणेबाबत.	रु.११,३०,२७३/- (करासहित) खर्चास आयुक्तालयाच्या २०५२ ०४८२ या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ करिता उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे.	भागविण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.
५.	०१/०६/२०२६	Appointment of Consultants for setting up a Project Management Unit (PMU) to support the Department in Aadhaar related initiatives in the State of Maharashtra	प्रस्तुत प्रस्तावाच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर चर्चेअंती शासन निर्णय, दि.०५.१०.२०२३ अन्वये Empanelment केलेल्या चार कंपन्यांनी प्रकल्प अंमलबजावणी समितीसमोर केलेल्या सादरीकरणाच्या आधारे M/s. Ernst & Young LLP यांच्यामार्फत Project Management Unit (PMU) to support the Department in Aadhaar related all initiatives in the State of Maharashtra संदर्भातील प्रस्तावास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याकरिता १ वर्षाकरिता येणाऱ्या रु.१,२९,००,०००/- (कर वगळून) खर्चास आयुक्तालयाच्या २०५२ ०४८२ या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ करिता उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.	समितीने घेतलेल्या निर्णयानुसार सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने अदा करावयाच्या अंदाजे एकूण रक्कम रु.१,२९,००,०००/- (कर वगळून) इतक्या खर्चास मागणी क्र. A-०४, मुख्य लेखाशिर्ष (२०५२)-सचिवालयीन सर्वसाधारण सेवा, (००) (११) माहिती तंत्रज्ञान संचालनालय (२०५२ ०४८२), "१७-संगणक खर्च" या लेखाशिर्षा अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीमधून भागविण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.
६.	०१/०६/२०२६	Approval for Procurement, Implementation and Post-facto ratification of "supply,	प्रस्तुत प्रस्तावाच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात	समितीने घेतलेल्या निर्णयानुसार सदर

अ.क्र.	समितीच्या बैठकीचा दिनांक	समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला विषय	समितीने घेतलेला निर्णय	निर्णयानुसार खर्चास देण्यात आलेली मान्यता
		installation, testing and commissioning of secured wired and wireless connectivity infrastructure equipment with 3years warranty and support” at the residence of Hon’ble Chief Justice of Bombay High Court.	आली. सदर चर्चेअंती मा.मुख्य न्यायमूर्ती, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निवासस्थानी स्थापित करण्यात आलेल्या “supply, installation, testing and commissioning of secured wired and wireless connectivity infrastructure equipment with ३years warranty and support” यास कार्योत्तर मान्यता प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यापोटी येणारा खर्च ₹२४,९१,४६७/- (excluding taxes) आयुक्तालयाच्या २०५२ ०४८२ या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ करिता उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यास मान्यता देण्यात आली आहे.	प्रस्तावाच्या अनुषंगाने अदा करावयाच्या अंदाजे एकूण रक्कम रु.२४,९१,४६७/- (excluding taxes) इतक्या खर्चास मागणी क्र. A-०४, मुख्य लेखाशिर्ष (२०५२)-सचिवालयीन सर्वसाधारण सेवा, (००) (११) माहिती तंत्रज्ञान संचालनालय (२०५२ ०४८२), "१७-संगणक खर्च" या लेखाशिर्षा अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीमधून भागविण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.
७.	१८/०६/२०२६	राज्यातील सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांना ई-ऑफिस (eOffice) प्रणाली अंतर्गत तांत्रिक स्वरुपाच्या सेवा पुरविण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालयाच्या स्तरावरील कार्यरत eOffice Team करिता १८ तांत्रिक	प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालयाच्या स्तरावरील कार्यरत ई-ऑफिस प्रणालीकरिता १८ तांत्रिक मनुष्यबळांच्या सेवांना तत्कालीन संचालनालयाच्या	समितीने घेतलेल्या निर्णयानुसार इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालयाच्या स्तरावरील कार्यरत ई-ऑफिस प्रणालीकरिता १८ तांत्रिक मनुष्यबळांच्या सेवांना दिनांक ०१ एप्रिल, २०२६ ते ३० जून, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यास व त्यापोटी येणाऱ्या अंदाजे एकूण रक्कम

अ.क्र.	समितीच्या बैठकीचा दिनांक	समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला विषय	समितीने घेतलेला निर्णय	निर्णयानुसार खर्चास देण्यात आलेली मान्यता
		मनुष्यबळांच्या सेवांना माहे दिनांक १ एप्रिल २०२६ ते ३० जून २०२६ मुदतवाढ व पुनर्रचनेनंतर एकूण २३ तांत्रिक मनुष्यबळांच्या सेवांना दिनांक ०१ जुलै, २०२६ ते ३० सप्टेंबर, २०२६ या कालावधीसाठीच्या नियुक्तीस मान्यता देणे आणि सदर कालावधीकरीता येणारा अनुक्रमे खर्च रु.५५,८४,५९७.८/- आणि रु.८०,९३,३४९.७८/- असे मिळून एकूण रु.१,३६,७७,९४७.५८/- (करासहित) इतक्या खर्चास मान्यता देण्याबाबत.	दि.२७.१२.२०२५ च्या पत्रान्वये दि.३१ मार्च, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. सदर मुदतवाढ संपुष्टात आली असल्याने उक्त १८ तांत्रिक मनुष्यबळांच्या सेवांना दिनांक ०१ एप्रिल, २०२६ ते ३० जून, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यास व त्यापोटी येणाऱ्या एकूण रु.५५,८४,५९७.८/- (करासहित) खर्च आयुक्तालयाच्या २०५२ ०४८२ या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ करिता उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तद्नंतर, ई-ऑफिस प्रणालीकरिता प्रस्तावित केलेल्या २३ तांत्रिक मनुष्यबळासह १ अतिरिक्त Project Manager असे मिळून एकूण २४ तांत्रिक मनुष्यबळांच्या सेवा दिनांक ०१ जुलै, २०२६ ते ३१ मार्च, २०२७ या कालावधीकरिता घेण्यास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर प्रयोजनाकरिता येणारा	रु.५५,८४,५९७.८/- (करासहित) इतक्या खर्चास व ई-ऑफिस प्रणालीकरिता प्रस्तावित केलेल्या २३ तांत्रिक मनुष्यबळासह १ अतिरिक्त Project Manager असे मिळून एकूण २४ तांत्रिक मनुष्यबळांच्या सेवा दिनांक ०१ जुलै, २०२६ ते ३१ मार्च, २०२७ या कालावधीकरिता घेण्यास व त्यापोटी प्रचलित दरानुसार येणा-या खर्चास मागणी क्र. A- ०४, मुख्य लेखाशिर्ष (२०५२)-सचिवालयीन सर्वसाधारण सेवा, (००) (११) माहिती तंत्रज्ञान संचालनालय (२०५२ ०४८२), "१७-संगणक खर्च" या लेखाशिर्षा अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीमधून भागविण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	समितीच्या बैठकीचा दिनांक	समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला विषय	समितीने घेतलेला निर्णय	निर्णयानुसार खर्चास देण्यात आलेली मान्यता
			खर्च महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाच्या तांत्रिक मनुष्यबळांच्या प्रचलित दरपत्रकानुसार आयुक्तालयाच्या २०५२ ०४८२ या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ करिता उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच राज्यात ई-ऑफिस प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कार्यरत असलेल्या सर्व तांत्रिक मनुष्यबळांना त्रिमाही प्रशिक्षण NIC, Mumbai व NIC, New Delhi यांच्यामार्फत उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.	
८.	१८/०६/२०२६	मंत्रालयातील सर्व प्रशासकीय विभागांना आयटी सुविधा पुरविण्यासाठी आणि नेटवर्क पायाभूत सुविधांच्या व्यवस्थापन करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालयामार्फत FMS Team अंतर्गत पुरविण्यात	प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालयामार्फत Facility Management Services अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या एकूण ४७ तांत्रिक	समितीने घेतलेल्या निर्णयानुसार इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालयामार्फत Facility Management Services अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या एकूण ४७ तांत्रिक मनुष्यबळांच्या सेवांना

अ.क्र.	समितीच्या बैठकीचा दिनांक	समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला विषय	समितीने घेतलेला निर्णय	निर्णयानुसार खर्चास देण्यात आलेली मान्यता
		येणाऱ्या एकूण ४७ तांत्रिक मनुष्यबळांच्या सेवांना दिनांक ०१ एप्रिल, २०२६ ते ३० सप्टेंबर, २०२६ या कालावधीसाठीच्या नियुक्तीस मुदतवाढ देणे व त्याकरिता रु.२,२०,४९,०५९.९२/- (करासहित) इतक्या खर्चास मान्यता देणे, तसेच, FMS Team करिता १३ अतिरिक्त मनुष्यबळ माहे ०१ जुलै, २०२६ पासून ३० सप्टेंबर, २०२६ पर्यंतच्या कालावधीकरीता घेण्यास मान्यता देणे व त्याकरीता रु.५५,२५,९७१.८६/- (करासहित) इतक्या खर्चास मान्यता देणेबाबत.	मनुष्यबळांच्या सेवांना तत्कालीन संचालनालयाच्या दि.२९.१०.२०२५ च्या पत्रान्वये दिनांक ०१ जून, २०२५ ते ३१ मार्च, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. सदर सेवांचा मुदतवाढीचा कालावधी दि.३१.०३.२०२६ रोजी संपुष्टात आलेला असल्याने सदर ४७ पदांना दिनांक ०१ एप्रिल, २०२६ ते दि.३० सप्टेबर, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यास व त्यापोटी येणारा एकूण रु.२,२०,४९,०५९.९२/- (करासहित) खर्च आयुक्तालयाच्या २०५२ ०४८२ या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ करिता उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच Facility Management Services करिता १३ अतिरिक्त मनुष्यबळ माहे ०१ जुलै, २०२६ पासून ३० सप्टेंबर, २०२६ पर्यंतच्या कालावधीकरीता घेण्यास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याकरीता येणारा खर्च रु.५५,२५,९७१.८६/- (करासहित) आयुक्तालयाच्या	दिनांक ०१ एप्रिल, २०२६ ते दि. ३० सप्टेंबर, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यास व त्यापोटी येणारा एकूण रक्कम रु.२,२०,४९,०५९.९२/- (करासहित) खर्चास व Facility Management Services करिता १३ अतिरिक्त मनुष्यबळ माहे ०१ जुलै, २०२६ पासून ३० सप्टेंबर, २०२६ पर्यंतच्या कालावधीकरीता घेण्यास त्याकरीता येणा-या एकूण रक्कम रु.५५,२५,९७१.८६/- (करासहित) खर्चास मागणी क्र. A-०४, मुख्य लेखाशिर्ष (२०५२)-सचिवालयीन सर्वसाधारण सेवा, (००) (११) माहिती तंत्रज्ञान संचालनालय (२०५२ ०४८२), "१७-संगणक खर्च" या लेखाशिर्षा अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीमधून भागविण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	समितीच्या बैठकीचा दिनांक	समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला विषय	समितीने घेतलेला निर्णय	निर्णयानुसार खर्चास देण्यात आलेली मान्यता
			२०५२ ०४८२ या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ करिता उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालयामार्फत Facility Management Services अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या मनुष्यबळांच्या सेवेची आवश्यकता आवर्ती स्वरुपाची असल्याने सदर तांत्रिक मनुष्यबळांच्या सेवांना वार्षिक मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीसमोर सादर करण्याबाबत निर्देश दिले आहेत.	
९.	१८/०६/२०२६	इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागामध्ये कार्यरत वरिष्ठ तांत्रिक व्यवस्थापक (Senior Technical Manager) या पदाच्या सेवेस दिनांक ०१ मे, २०२६ ते ३० एप्रिल, २०२७ पर्यंत मुदतवाढ देणे व त्यापोटी येणाऱ्या एकूण रु.७४,७४,२५६.८८/- (करास हित) इतका खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव.	प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार तत्कालीन विभागाच्या दि.२७.१२.२०२५ च्या पत्रान्वये वरिष्ठ तांत्रिक व्यवस्थापक या तांत्रिक मनुष्यबळाच्या सेवेचा कालावधी दि.३१ एप्रिल, २०२६ अखेर संपुष्टात आला असल्याने सदर तांत्रिक	समितीने घेतलेल्या निर्णयानुसार सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रचलित दरानुसार येणा-या खर्चास मागणी क्र. A-०४, मुख्य लेखाशिर्ष (२०५२)-सचिवालयीन सर्वसाधारण सेवा, (००) (११) माहिती तंत्रज्ञान संचालनालय (२०५२ ०४८२), "१७-संगणक खर्च" या लेखाशिर्षा अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीमधून

अ.क्र.	समितीच्या बैठकीचा दिनांक	समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला विषय	समितीने घेतलेला निर्णय	निर्णयानुसार खर्चास देण्यात आलेली मान्यता
			मनुष्यबळांच्या सेवेस दिनांक ०१ मे, २०२६ पासून ११ महिन्याच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर प्रयोजनाकरिता येणारा खर्च महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाच्या तांत्रिक मनुष्यबळांच्या प्रचलित दरपत्रकानुसार आयुक्तालयाच्या २०५२ ०४८२ या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ करिता उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.	भागविण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.
१०.	१८/०६/२०२६	मुख्यमंत्री सचिवालयकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग (मातं), दिनांक १३.०३.२०२६ मधील तरतुदीनुसार मे. किर्तने आणि पंडीत चार्टर्ड अकाउंट्टस यांच्यामार्फत “सल्लागार” या पदावर दि.१० जून, २०२६ पासून १ वर्षाच्या कालावधी करीता उपलब्ध करून देणे व त्याकरीता येणाऱ्या खर्च रु.२०,००,०००/- (कर वगळून) मान्यता देण्याबाबत.	प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार मुख्यमंत्री सचिवालयकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग (मातं), दिनांक १३.०३.२०२६ मधील तरतुदीनुसार मे. किर्तने आणि पंडीत चार्टर्ड अकाउंट्टस यांच्यामार्फत “सल्लागार” या मनुष्यबळाच्या दि.१० जून,	समितीने घेतलेल्या निर्णयानुसार सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने अदा करावयाच्या अंदाजे एकूण रक्कम रु.२०,००,०००/- (कर वगळून) इतक्या खर्चास मागणी क्र. A-०४, मुख्य लेखाशिर्ष (२०५२)-सचिवालयीन सर्वसाधारण सेवा, (००) (११) माहिती तंत्रज्ञान संचालनालय (२०५२ ०४८२), " १७-संगणक खर्च" या लेखाशिर्षा अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीमधून

अ.क्र.	समितीच्या बैठकीचा दिनांक	समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला विषय	समितीने घेतलेला निर्णय	निर्णयानुसार खर्चास देण्यात आलेली मान्यता
			२०२६ पासून १ वर्षाच्या कालावधीकरीता मनुष्यबळ घेण्यास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर प्रयोजनाकरीता येणाऱ्या खर्च रु.२०,००,०००/- (कर वगळून) आयुक्तालयाच्या २०५२ ०४८२ या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ करिता उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.	भागविण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.
११.	१८/०६/२०२६	स्टेट डेटा सेंटर महाईएचआरएमएस प्रणालीकरिताच्या ६ व्हर्चुअल मशिन्ससाठी (VMs) 'पोस्टग्रेस मॅनेज्ड सपोर्ट' (Postgres Managed Support) प्रदान करणे व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मंजूरी देणे.	The PIC has given approval for eHRMS project hosted at Maharashtra State Data Centre for "Postgres Managed Service Support" for 6 virtual machines (VMs) including DC & DR. Also, Approval has been given for the estimated expenditure of ₹3.5 crore for the next 3 years arising from this requirement. This expenditure will be incurred through the Electronics, Information Technology and Artificial Intelligence Department.	समितीने घेतलेल्या निर्णयानुसार सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने पुढील ३ वर्षांतील ३.५ कोटी रुपयांच्या अंदाजित खर्चास मागणी क्र. A-०४, मुख्य लेखाशिर्ष (२०५२)-सचिवालयीन सर्वसाधारण सेवा, (००) (११) माहिती तंत्रज्ञान संचालनालय (२०५२ ०४८२), " १७-संगणक खर्च" या लेखाशिर्षा अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीमधून भागविण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	समितीच्या बैठकीचा दिनांक	समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला विषय	समितीने घेतलेला निर्णय	निर्णयानुसार खर्चास देण्यात आलेली मान्यता
१२.	१८/०६/२०२६	स्टेट डेटा सेंटर (SDC) येथे उपलब्ध करून देण्यात आलेल्या व्हर्चुअल मशिन्सच्या (VMs) समान क्षमतेची (१०० टक्के) डिझास्टर रिकव्हरी (DR) सुविधा दिल्ली येथील 'एनआयसी एनजीसी २.०० (NIC NGC २.०) येथे प्रदान करणे.	The PIC has given approval for the eHRMS Project to establish 100% equivalent Disaster Recovery (DR) capabilities for all Virtual Machines (VMs) currently deployed at the Maharashtra State Data Center (MHSDC). The DR facilities shall be provisioned either through a temporary rental arrangement with NIC at NDC data centre, Shastri Park for a period of four months, or until the permanent Disaster Recovery infrastructure at SDC, Nagpur is fully operational, whichever occurs earlier. Also, The PIC gives approval to associated expenditure arising from this initiative. All expenditure shall be borne through the Electronics, Information Technology, and Artificial Intelligence Department.	समितीने घेतलेल्या निर्णयानुसार सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने येणा-या खर्चास मागणी क्र. A-०४, मुख्य लेखाशिर्ष (२०५२)-सचिवालयीन सर्वसाधारण सेवा, (००) (११) माहिती तंत्रज्ञान संचालनालय (२०५२ ०४८२), " १७-संगणक खर्च" या लेखाशिर्षा अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीमधून भागविण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णयान्वये आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालय यांना प्रचलित नियमानुसार आवश्यक अटी व शर्तीचे पालन करून उपरोक्त प्रस्तावांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त खर्चाकरिता कक्ष अधिकारी, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई हे आहरण व संवितरण अधिकारी व उपसचिव, माहिती तंत्रज्ञान हे नियंत्रक अधिकारी असतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०७०९१७१९४३४८११ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

DURGAPRASAD
POCHAYYA
MYLAWARAM

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=EIT and AI, 2.5.4.20=F4FD0AC26AD2A365A8E829907C5E76B911FED9B1B9E48CC2854C4B8A14B0D70C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BEFBB0AE84804C4DA8D35ABF2195EBB1DC727DE9B0A094BEA77F4CA6BE5965DB, cn=DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2026.07.09 17:21:38 +05'30'

(दुर्गाप्रसाद मैलावरम)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. महाराष्ट्र विधान परिषद सभापती यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
४. मा. महाराष्ट्र विधान सभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
५. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, विधान भवन, मुंबई
८. मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा, विधान भवन, मुंबई
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
१०. शासनाचे सर्व मा. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
११. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,
१२. प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१३. महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१४. महालेखापाल १/२ लेखा व परीक्षा, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य,
१६. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
१७. संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई,
१८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित,
१९. निवडनस्ती/मातं.